पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १७
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक : ५/३/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शुक्रवार दि.५/३/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.एकनाथ मोटे
४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५. मा.खोमणे लता हनुमंत
६. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
७. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.एकनाथ मोटे अनुमोदक : मा.लता खोमणे

शुक्रवार दिनांक १९/०३/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------------

मा.सभापती :- शुक्रवार दिनांक १९/०३/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १७
सभावृत्तांत
(दिनांक ५.३.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक : १९/३/२०१० वेळ : दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.५.३.२०१० ची तहकुब सभा शुक्रवार दि.१९/३/२०१० रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव,मा.चिंचवडे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

ठराव क्रमांक :- २७४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९/३/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/२३८/१० दि.११.२.२०१०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.श्रीम.पुनम अशोक भंगाळे यांनी महानगरपालिका सेवेमधील वैद्यकिय अधिकारी या पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करुन त्यांनी महानगरपालिकेमध्ये तारण ठेवलेले र.रु. १०,०००/- चे राष्ट्रीय बचतपत्र जप्त करुन सदरची रक्कम महानगरपालिका कोषागारात जमा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक :- २७५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १९/३/२०१० विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/९१/२०१० दि.१५.२.२०१०

विषय :- श्री.फुलचंद गिरजा अडागळे - गटरकुली, यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्याबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- २७६ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १९/३/२०१० विभाग : ब प्रभाग
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बप्र/कावि/१०/१० दि.१८.०२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३४ गांधीनगर व इतर आवश्यक ठिकाणी पाईपलाईन टाकणेकामी र.रु.४३,१३,९७४/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ४०१ /२०१०
दिनांक - २० / ३ /२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.